BN-7

# फिशिंग अटॅक्सच्या बाबतीत ग्राहकांकरिता आरबीआयकडून महत्त्वपूर्ण सूचना

- **भारतीय रिझर्व्ह बँकेकडून आल्याचा दावा करणाऱ्या फिशिंग ई–मेल्सना प्रतिसाद देऊ नका.**
- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या असे निदर्शनास आले आहे की ''बँक ग्राहकांना त्यांच्या बँक खात्यांचा तपशील अद्ययावत करण्यासाठी आमंत्रण'' ह्या शीर्षकाखाली ई-मेल्स पाठविण्यात येत आहेत.
- रिझर्व्ह बँक हे स्पष्ट करत आहे की तिने अशा प्रकारचे कोणतेही ई-मेल्स पाठविलेले **नाहीत.** रिझर्व्ह बँक किंवा बँका ह्या कोणत्याही हेतूसाठी बँक खात्याच्या तपशीलाची विचारणा करणारा संपर्कव्यवहार कधीच करत नाहीत. **रिझर्व्ह बँकेकडून जनतेला आवाहन करण्यात येत आहे की जनतेने अशा प्रकारच्या ई–मेल्सना प्रतिसाद देऊ नये आणि कोणत्याही व्यक्तीशी कोणत्याही हेतूसाठी त्यांच्या बँक खात्याचा तपशील प्रदान करू नये.**
- घोटाळेबाज हे पत्रांद्वारे, ई-मेल्सद्वारे, मोबाइल फोन्सद्वारे, एसएमएस, इत्यादींद्वारे लोकांना आकर्षक योजनाही पाठवित असतात. अशा योजना विश्वासपात्र असल्याचे दर्शविण्यासाठी, संपर्कव्यवहार हा बऱ्याचदा लेटरहेडवरून/संकेतस्थळावरून केला जातो, हे लेटरहेड/ही संकेतस्थळे भारतीय रिझर्व्ह बँकेसारख्या काही सार्वजनिक प्राधिकरणाची असल्याचे भासविले जाते. ह्या योजनांवर अशा प्राधिकरणांच्या वरिष्ठ कार्यकारी अधिकाऱ्यांची/ज्येष्ठ अधिकाऱ्यांची स्वाक्षरी स्पष्टपणे दर्शविली जाते. तथापि, अधिकाऱ्यांची केवळ नावे बरोबर असली, तरीही त्यांच्या स्वाक्षऱ्या नकली असतात. रिझर्व्ह बँक/सार्वजनिक प्राधिकरण यामधील विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या तथाकथित आरबीआय अधिकाऱ्याच्या संपर्क तपशीलाचा समावेश योजना दस्तऐवजामध्ये करण्यात आलेला असू शकतो. **परदेशातून प्राप्त होणाऱ्या पैशांसंबंधात अशा योजनांना कोणत्याही प्रकारे प्रतिसाद देण्याबाबत रिझर्व्ह बँक जनतेला सावधगिरीचा इशारा देत आहे.**
- **अज्ञात संस्थांकडून देण्यात येणाऱ्या अशा योजना/प्रस्ताव यामध्ये सहभागी होण्याप्रती कोणतेही वित्तप्रेषण करण्याबाबतही जनतेला सावधगिरीचा इशारा देण्यात येत आहे** कारण अशी वित्तप्रेषणे ही बेकायदेशीर आहेत आणि भारतातील कोणत्याही रहिवासीने प्रत्यक्षपणे/अप्रत्यक्षपणे अशी भरणा रक्कम गोळा केल्यास आणि प्रभावी केल्यास अथवा भारताबाहेर वित्तप्रेषित केल्यास, सदर रहिवासी हा विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या उल्लंघनाविरोधात कार्यवाहीसाठी पात्र असेल. अशा योजना ह्या फसवणुकीच्या उद्देशाने बनविण्यात आलेल्या असतात आणि लोकांना असे आवाहन करण्यात येत आहे की त्यांना अशा योजना देऊ करण्यात आल्यास किंवा अशा कोणत्याही लबाडीला ते बळी पडल्यास, त्यांनी स्थानिक पोलिसांकडे/सायबर-गुन्हेगारी प्राधिकरणाकडे ताबोडतोब तक्रारीची नोंद करावी.
- **रिझर्व्ह बँक, कोणत्याही नावाने, कोणत्याही प्रकारची वित्तव्यवस्था हाती घेत नाही आणि अशा बनावट संपर्कव्यवहाराच्या प्रतिसादामध्ये वित्तप्रेषित करण्यात आलेल्या पैशांच्या वसुलीची कोणतीही जबाबदारी घेत नाही.**



एच डी एफ सी बँक
आम्ही जाणतो तुमचं जग